संक्षिप्त वृत्त

देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करताना देवस्थानचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधी.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतले लक्ष्मी-नृसिंहाचे दर्शन

अकलूज : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री क्षेत्र निरा नरसिंहपूर (ता.इंदापूर) येथे श्री लक्ष्मी-नृसिंहाचे शनिवारी दर्शन घेतले. यावेळी त्यांनी मंदिरामध्ये श्री नृसिंहाची पूजा व आरती केली. पूजेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंदिर परिसरात विकास कामांची पाहणी करीत अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. लक्ष्मी-नृसिंह देवस्थान हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कुलदैवत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येथे दर्शनासाठी येतात. यावेळी देवेंद्र फडणवीस यांचा लक्ष्मी-नृसिंह देवस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आ.विजय शिवतारे, आ. राहुल कुल,माजी खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते,वासुदेव काळे, पद्मजादेवी मोहिते पाटील, पृथ्वीराज जाचक, बाळासाहेब गावडे, मयुरसिंह पाटील, रंजनकाका तावरे, प्रवीण माने, हनुमंत कोकाटे, भाजपचे तालुकाध्यक्ष तेजस देवकाते आदी उपस्थित होते.

मोबाईल घेऊन चोरटा दुचाकीवरून पसार

माळशिरस : माझ्या मोबाईल मधील बॅलन्स संपला आहे. फोन करण्यासाठी तुमचा मोबाईल देता का ? असे म्हणत एका महिलेच्या हातातील मोबाईल हिसकावून घेऊन चोरटा दुचाकीवरून पोबारा केला. ही घटना माळशिरस येथील वनविभागाच्या कार्यालयासमोर शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. यासंदर्भात वनविभागातील भक्ती चंद्रकांत गायकवाड (रा.माळीनगर) या महिला कर्मचाऱ्यांनी माळशिरस पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या शुक्रवारी दुपारी घरी जाण्यासाठी कार्यालयातून निघाल्या होत्या. पंढरपूररोड लगत एक अनोळखी इसम त्यांच्याजवळ येऊन माझा बॅलन्स संपला आहे. तुमचा फोन देता का ? असे म्हणत त्यांच्या हातातील १० हजार रुपये किमतीचा मोबाईल हिसकावून घेतला. आणि थोड्या अंतरावर थांबलेल्या त्याच्या जोडीदाराच्या दुचाकी पाठीमागे बसून वेळापूरच्या दिशेने पसार झाला. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार थोरात पुढील तपास करीत आहेत.

मांगी येथे टेम्पोच्या धडकेने सायकल चालक ठार

करमाळा : वेगाने जाणाऱ्या आयशर टेम्पोच्या धडकेने ५४ वर्षीय सायकल चालक गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात वांगी (ता .करमाळा) येथील नगर करमाळा रोडवर शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडला. सुभाष नामदेव शिंदे (वय ५४ रा. वांगी ता .करमाळा) असे मयत सायकल चालकाचे नाव आहे. ते आपल्या सायकलवरून तोडरमल यांच्या शेतासमोरून निघाले होते. त्यावेळी एमएच १६ सीडी-३६ ७२ या क्रमांकाचा टेंपोधडकल्याने हा अपघात घडला. अपघातानंतर टेम्पो चालक वाहन सोडून पसार झाला. या अपघाताची फिर्याद मयताचा मुलगा योगेश शिंदे यांनी करमाळा पोलिसात दाखल केली. पुढील तपास सहाय्यक फौजदार गुटाळ करीत आहेत.

मेडशिंगी येथून ५२ हजारांचे दागिने चोरले

सांगोला : उन्हाळ्याचे दिवस असल्याने घराचा दरवाजा उघडे ठेवून झोपल्याचा फायदा चोरट्याने घेत ५२ हजारांचे सोन्याचे दागिने चोरून नेले. ही घटना २९ मार्च रोजी रात्री मेडशिंगी येथील प्रसाद गोरख इंगोले यांच्या घरी घडली. उन्हाळ्याचे दिवस असल्याने प्रसाद इंगोले व कुटुंबिय दरवाजा उघडे ठेवून घरात झोपले होते. शनिवारी मध्यरात्री एकच्या सुमारास कपाट वाजल्याने प्रसाद यांना जाग आली त्यावेळी एक अज्ञात इसम घरातून बाहेर पडून पळून गेल्याचे त्यांना दिसले. त्याने कपाटातील झुबे, सोन्याचे मणी, सोन्याचे बाळी, व गंठण असे १७ ग्रॅम वजनाचे अंदाजे ५२ हजार रुपयाचे सोने लंपास केले होते. अज्ञात चोरट्याविरुद्ध सांगोला पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल झाली आहे.

अकलूज येथील चौकात तरुणास रॉडने मारहाण

अकलूज : किरकोळ भांडणाचा राग धरून एका तरुणास लोखंडी रॉड, काठी आणि दगडाने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना अकलूज येथील गांधी चौकात गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. याप्रकरणी अकलूजच्या पोलिसांनी सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात अशपाक गफूर तांबोळी (वय २२ रा.संग्रामनगर) या जखमीने अकलूज पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून मोबीन शेख, दिलावर शेख, तरबेज शेख, मस्तान शेख (सर्व रा.राऊत नगर) आणि अन्य दोन अनोळखी अशा ६ जणांवर गुन्हा दाखल केला. पूर्वीच्या किरकोळ भांडणावरून वरील सहा जणांनी मिळून त्याला मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार बकाल पुढील तपास करीत आहेत .

बार्शी येथे इंडिका मोटार पळवली

बार्शी : येथील जगदंबा वॉशिंग सेंटर जवळ लावलेली एमएच१२-डीएस-२६८९ या क्रमांकाची टाटा इंडिका मोटर चोरट्याने बनावट चावीचा वापर करून पळवल. ही चोरी शनिवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. यासंदर्भात बशीर अब्दुल शेख (रा.जैनमंदिर समोर बार्शी) यांनी बार्शी शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. हवालदार मुळे पुढील तपास करीत आहेत.

हिंदू नववर्ष शोभायात्रा उत्साहात : भगव्या रंगाने रंगले शहर

भारतमाता की जय, वंदे मातरमच्या घोषणा; हजारोंचा सहभाग

सोलापूर/प्रतिनिधी

कृष्णलल्ला हम आएंगे, मंदिर वहीं बनाएंगे, जय भवानी जय शिवराय, भारतमाता की जय, वंदे मातरम अशा घोषणा देत, भगवे ध्वज, फेट्यांसह ढोल ताशांचा गजर करीत हिंदू नववर्षानिमित्त शहरातून शोभायात्रा उत्साहात काढण्यात आली. शहरात सर्वत्र घरांवर, दुचाकींवर भगवे ध्वज लावण्यात आल्याने शहर भगव्या रंगात रंगून गेले होते.

विजयी चौकात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून शोभायात्रेस प्रारंभ झाला. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, संस्थापक अध्यक्ष रंगनाथ बंग, उत्सव समिती अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, कार्यवाह ज्ञानेश्वर म्याकल, उपाध्यक्ष प्रकाश कलकोटे, कोषाध्यक्ष नितीन करवा, शोभायात्रा प्रमुख चिदानंद मुस्तारे, वरदराज बंग, रंगनाथ बंकापूर, चंद्रिका चौहान , सतीश जिरांगकलगी, विजय प्याटी, बाळू राठी, रामानुज होलाणी, पद्मशाली महिला संस्थेच्या अध्यक्षा मेघा इट्टम, ममता तलकोकुल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर संघचालक राजेंद्र काटवे, भाजपाचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, गुरुशांत धुत्तरगावकर, नितीन मिस्किन, रोहिणी तळवळकर, प्रा. मोहिनी पत्की, श्रीनिवास दायमा, जगदीश भुतडा, जगदीश पाटील, चेतन शर्मा, शिवानंद कल्लूरकर, श्याम येमुल, पुरुषोत्तम उडता, उदय वैद्य, सत्यनारायण गुर्रम, ॲड. प्रदीपसिंग राजपूत, प्राचार्य गजानन धरणे, प्रथमेश कोठे, राजू राठी आदी उपस्थित होते.

श्री पंचमुखी हनुमान देवस्थानतर्फे सजवलेल्या रथात श्री पंचमुखी हनुमानाची उत्सवमूर्ती ठेवण्यात आली होती. या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी हिंदू बांधवांनी गर्दी केली होती. तमिळनाडू येथील कुंभकोणम येथून आणण्यात आलेल्या पंचधातूपासून बनवलेल्या प्रभू श्रीराम, श्री लक्ष्मण, श्री सीतामाई तसेच हनुमंतरायाच्या उत्सवमूर्ती या शोभायात्रेत सहभागी करण्यात आल्या होत्या. तसेच छत्रपती श्री शिवाजी महाराज, झाशीची राणी लक्ष्मीबाई आदी महापुरुषांच्या पोषाखात मुले - मुली होत्या. त्यामागील रथात भारतमातेची प्रतिमा होती. तसेच अनेक लहान मुलांनी दांडपट्टा, तलवारबाजी असे साहसी युद्धप्रकार सादर केले. शोभायात्रेच्या अग्रभागी श्रद्धानंद समाज मानाचा श्री आजोबा गणपती ट्रस्टच्या ढोल पथकाने शोभायात्रेत रंगत आणली.

शोभायात्रेत ठेवण्यात आलेली श्री अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरातील मूर्तीची प्रतिकृती सर्वांच्या आकर्षणाचा विषय ठरली. बाळीवेस येथील विजयी चौकापासून सुरू झालेली ही शोभायात्रा टिळक चौक, मधला मारुती, माणिक चौक, सोन्या मारुती, सावरकर मैदान, नवी पेठमार्गे शिवस्मारक येथे विसर्जित झाली. हिंदू बांधवांनी केले रांगोळी आणि आतिषबाजीने स्वागत चौकाचौकात रांगोळी काढून तसेच फटाक्यांची आतिषबाजी करून हिंदू बांधवांनी हिंदू नववर्ष शोभायात्रेचे प्रचंड मोठे स्वागत केले. अनेक चौकार मध्ये शोभायात्रेत सहभागी झालेल्या हिंदू बांधवांना हिंदू बांधवांकडून सरबत, ताक, मिठाई देण्यात येत होती.

बाळीवेस येथून काढण्यात आलेल्या शोभायात्रेत भगवे ध्वज घेऊन सहभागी झालेले बांधव. (दुसऱ्या छायाचित्रात) शोभायात्रेतील राम लल्लाची मूर्ती.

जुळे सोलापुरात लेझीमने आणली रंगत

हिंदू नववर्ष महोत्सव समितीतर्फे जुळे सोलापुरात काढण्यात आलेल्या भगवे ध्वज आणि लेझीमने रंगत आणली. किल्लेदार मंगल कार्यालयासमोर शोभायात्रेची सुरुवात झाली. याप्रसंगी प्रा.डॉ. नरेंद्र काटीकर, शोभायात्रा प्रमुख जयदेव सुरवसे, ॲड. शर्वरी रानडे, कार्याध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, उपाध्यक्ष रवींद्र नाशिककर, विकास कुलकर्णी, अनंत कुलकर्णी, विशाल पाटील सुनील भराडकर आदी उपस्थित होते. शोभायात्रेच्या अग्रभागी उद्घोषणा करणारी रिक्षा होती. यामध्ये भगवे दारी आणि मशालधारी होते. लेझीम पथकाने बहारदार लेझीमचे डाव सादर करीत उपस्थित त्यांची मने जिंकली. शिवप्रताप चौक, डी मार्ट चौक या ठिकाणी लेझीम व साहसी पथकांनी कला सादर केली. किल्लेदार मंगल कार्यालयापासून सुरू झालेली ही शोभायात्रा शिवप्रताप चौक, रेल्वे पूल, डी मार्टमार्गे केएलई प्रशालेसमोरच्या मैदानावर सांस्कृतिक कार्यक्रमाने विसर्जित झाली.

नमो सन्मानचे पैसे पुढील आठवड्यात मिळणार

सोलापूर/प्रतिनिधी

शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सहाव्या हप्त्याचा लाभ व यापूर्वीच्या प्रलंबित हप्त्याची रक्कम देण्यासाठी राज्य शासनाने १६४२.१८ कोटी निधी वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. पुढील आठवड्यापासून ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहेत. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रतिक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना दोन हजार रुपयांचा हप्ता मिळणार आहे.

सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी, नमो शेतकरी महासन्मान निधी योजना घोषित केली. त्यास अनुसरुन केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या प्रति वर्ष, प्रति शेतकरी सहा हजार या अनुदानामध्ये राज्य शासनाची आणखी सहा हजार इतक्या निधीची भर घालणारी नमो शेतकरी महासन्मान निधी ही योजना सुरु केली आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत लाभार्थ्यांना आतापर्यंत पाच हप्त्याचे १० हजार रुपये वितरित केली आहे. डिसेंबर २०२४ ते मार्च २०२५ या महिन्यातील सहाव्या हप्त्यासाठी शेतकरी प्रतिक्षेत होते. तसेच यापूर्वीच्या हप्त्यांमधील काही त्रुटीमुळे काही शेतकरी या अनुदानापासून वंचित होते.

पाच लाख ४० हजार शेतकऱ्यांना लाभ

जिल्ह्यात पाच लाख ४० हजार प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचे लाभार्थी आहेत. तेवढेच लाभार्थी नमो शेतकरी महासन्मान योजनेसाठी आहेत. या योजनेत सुरुवातीला सहा लाख ९० हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. त्यात छाननी झाल्यानंतर आता पाच लाख ४० हजार लाभार्थी पात्र ठरले आहेत. लवकरच ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे.

मोटारीच्या धडकेने दुचाकी चालक ठार

सोलापूर : दुचाकी वरून प्रवास करताना पाठीमागून चार चाकी वाहन धडकल्याने दुचाकीवरील तरुण गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वी मयत झाला.हा अपघात हन्नुर ब्रिज (ता.अक्कलकोट) येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडला .प्रशांत तारासिंग चव्हाण (वय ३२ शिवाजीनगर तांडा अक्कलकोट) असे मयताचे नाव आहे. ते शनिवारी रात्री १२ वाजेच्या सुमारास दुधनी ते अक्कलकोट असा प्रवास करीत होते. हन्नूर येथील ब्रीज जवळ पाठीमागून एमएच१४-एफसी- १७४० या क्रमांकाची मोटर धडक दिल्याने ते गंभीर जखमी होऊन बेशुद्ध झाले होते. त्यांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले . या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

ईदगाह मैदानावर नमाज पठाणाची तयारीचे काम पूर्ण झाले आहे.

ईदनिमित्त ईदगाह मैदानावर नमाजची तयारी

सोलापूर/प्रतिनिधी

शहरात रमजान ईदनिमित्त प्रशासनाच्या वतीने तयारी पूर्ण झाली आहे. शहरातील विविध ईदगाह मैदानावर नमाज पठण होणार आहे. त्यानुसार शहर पोलिस आयुक्तालयाकडून दीड हजार पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचा चोख बंदोबस्त तैनात केला आहे.

३१ मार्च रोजी शहरात रमजान ईद साजरी करण्यात येणार आहे. शहरात ३६ ठिकाणी फिक्स पॉइंट लावण्यात आले आहेत. रमजान ईदनिमित्त पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या नेतृत्वाखाली होटगी रोडवरील आलमगीर ईदगाह मैदान सकाळी ९ वाजता, पानगल हायस्कूलच्या शाही आलमगीर ईदगाह सकाळी ९ वा., जुनी मिल कंपाऊंड आदिल शाही ईदगाह सकाळी ९.३० वा., रंगभवन येथील अहले हदीस ईदगाह सकाळी ७.३० वा., सावरकर मैदान (जुने आसार) ईदगाह मैदानावर सकाळी १०.३० वा. मुख्य नमाज पठण होईल. तीन पोलिस उपायुक्त, ५ सहायक पोलिस आयुक्त, २२ पोलिस निरीक्षक, ६५ पोलिस उपनिरीक्षक, ७०० पोलिस कर्मचारी, ४०० होमगार्ड व राज्य राखीव दलाची तुकडी असा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

जागेच्या कारणावरून मारहाण; दोन जखमी

सोलापूर : भावकीतील जागेच्या वादातून काठी आणि दगडाने केलेल्या मारहाणीत पती-पत्नी जखमी झाले. ही घटना राळेरास (ता.दक्षिण सोलापूर) येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. रवींद्र दत्तात्रय साबळे (वय ४२) आणि त्यांची पत्नी अनिता साबळे (वय ३० दोघे रा.राळेरास) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना मार्डी येथे प्राथमिक उपचार करून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.शनिवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास त्यांच्या घराजवळ अविनाश साबळे आणि त्याच्या साथीदाराने मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

बुधवारी महाआरोग्य सर्वरोग निदान अन् रक्तदान शिबिर

सोलापूर/प्रतिनिधी

लोकनेते स्व. ब्रह्मानंद मोरे यांच्या २६ व्या पुण्यस्मरणानिमित्त लोकनेते स्व. ब्रह्मानंद मोरे समाजसेवा प्रतिष्ठान, सोलापूरच्या वतीने बुधवार दि. २ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९ वाजता मोफत महाआरोग्य सर्व रोग निदान शिबिर आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे ,अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्री श्री श्री जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी यांच्या दिव्य सानिध्यात अक्कलकोट रोडवरील श्री ब्रहन्मठ होटगी शिक्षण संकुलातील एसव्हीसीएस प्रशालेत हे महाआरोग्य शिबीर होणार आहे. आ. विजयकुमार देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी आ. हरिष पिंपळे, आ. सुहास बाबर आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या रक्तदान शिबिरात ५०० बाटल्या रक्त संकलन करण्यात येणार आहे. २०० मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येतील. रक्तातील विविध तपासण्या, शुगर, बीपी, थुंकी, लघवी, इसीजी, हृदय तपासणी व अन्य आजारांच्या तपासण्या करण्यात येणार आहेत. शस्त्रक्रियेस पात्र रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात येईल. मोफत चष्मे वाटप, आवश्यकतेनुसार औषध गोळ्या मोफत दिले जाणार आहे. या शिबिराचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष बाळासाहेब मोरे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस माजी नगरसेवक शिवानंद पाटील, शांतव्या स्वामी, संजय टोपे आदी उपस्थित होते.

तेव्हाही नाही झुकलो,आताही बारामतीकरांपुढे झुकणार नाही

पालकमंत्री जयकुमार गोरे पुन्हा विरोधकांना ललकारले

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूरचे पालकमंत्री आमदार जयकुमार गोरे हे विरोधकांवर पुन्हा उसळले आहेत.जनता आपल्यासोबत असल्याने आपल्या केसाला कुणीही धक्का लावू शकणार नाही,असा इशारा काही दिवसांपूर्वी त्यांनी दिला होता. कुणीही कितीही काळ्या बाहुल्या फिरवून टाकल्या तरी आपल्यावर काहीच फरक पडणार नाही,असे सडेतोड विधानही त्यांनी केले होते. आता परत एकदा त्यांनी हल्लाबोल केल्याने विरोधकांचे धाबे दणाणले आहे. साडेतीन जिल्ह्याच्या पक्षाचे बालेकिल्ला असलेल्या सातारा जिल्ह्यात अस्तित्वच ठेवले नाही. आता सोलापूर, सांगली नव्हे; तर जळीस्थळी काष्टी पाषाणी त्यांना गोरेच दिसतो आहे. बारामतीकरांच्या छातीत सर्वांत पहिल्यांदा कळ आली; पण, मी बारामतीच्या पुढे कधी झुकलो नाही अन् झुकणारही नाही,असा निर्वाणीचा इशारा त्यांनी दिला आहे.

माण तालुक्यातील आंधळी येथील सत्कार समारंभात जयकुमार गोरे बोलत होते. ते म्हणाले, विरोधकांच्या षडयंत्राकडे मी यापूर्वी जास्त मनावर न घेता दुर्लक्ष करायचो. पण आता कार्यक्रम केल्याशिवाय सुटीच नाही, असा निर्णय मी आता घेतला आहे मी बारामतीच्या पुढे झुकलो असतो, तर माझी आम दारकी सोपी झाली असती. पण, पाण्यापासून माझी जनता वंचित राहिली असती. बारामतीकरांना माझा विरोध नाही, तर माझा विरोध त्यांना आहे, ज्यांनी माझ्या मातीला पाण्यापासून, विकासापासून वंचित ठेवले. गोरे यांना मिळाल्यावर बारामतीकरांचा जळफळाट झाला. त्यातूनच त्यांच्यावर बालंट आणण्याचा प्रयत केला गेला. पण, गोरे यांनी असा काही डाव टाकला की सर्व विरोधक धोबीपछाड झाले. आम्ही जयकुमार गोरेंच्या पाठीशी छातीचा कोट करुन उभे राहू, असा शब्द डॉ. दिलीपराव येळगावकर यांनी जाहीर कार्यक्रमातून दिला.

या वेळी सोनिया गोरे, माजी आमदार डॉ. दिलीपराव येळगावकर, डी. एस. काळे, अर्जुन काळे, अरुण गोरे, शिवाजीराव शिंदे, गणेश सट्टे, संजय गांधी, किसन सस्ते, बलवंत पाटील, बाळासाहेब कदम, सिध्दार्थ गुंडगे, हरिभाऊ जगदाळे, विशाल बागल, मिनाक्षी काळे, मनीषा काळे, गुलाब उगलमोगले, सोमनाथ भोसले, प्रा. राजेंद्र जगदाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

संघर्ष माझ्या पाचवीला पूजला आहे

आतापर्यंतच्या सर्वच निवडणुकीत माझ्या पाचवीला संघर्ष पुजला आहे. ज्यांच्याकडे संघर्षातून वाट काढायची क्षमता असते, तो पुढे जातो. ती क्षमता घेऊन मी जन्माला आलेलो आहे. हा संघर्ष मी माझ्या मातीच्या सन्मानासाठी केला आहे. माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर अस्थिविसर्जनसुद्धा माझ्या विरोधकांनी करू दिले नाही, लगेच षडयंत्रे सुरू झाली. मी आमदार, मंत्री होऊ नये, यासाठी नदीकाठी पूजा करण्यात आल्या. मंत्री झाल्यावरही काहींनी पूजा केल्या. आपल्या मातीतला मंत्री झाल्यावर आनंद होतो, पण माझ्याबाबत तसे झाले नाही. पण जनतेचा आशीर्वाद माझ्या पाठीशी आहे, असे पालकमंत्री गोरे म्हणाले.